


दैनिक निडर निर्भिड
जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com RNI NO-MAHMAR/2022/90217
वर्ष ३ रे अंक : ३४५ वा शुक्रवार दि १७ एप्रिल २०२६ पृष्ठ ८ किमंत ३ रुपये

# ठाकरे विधान परिषदेवर जात नसतील, तर काँग्रेसला उमेदवारी द्या, सपकाळांची मागणी, मतांचा कोटा निर्णायक

**वृत्तसंस्था/मुंबई**

महाराष्ट्र विधान परिषदेच्या नऊ जागांसाठी १२ मे रोजी निवडणूक होणार असल्याचे निवडणूक आयोगाकडून गुरुवारी जाहीर करण्यात आले. विधान परिषदेच्या नऊ जागांसाठी विधानसभेचे आमदार मतदान करणार आहेत. विधान परिषदेसाठी सकाळी ९ वाजल्यापासून दुपारी ४ वाजेपर्यंत मतदान होईल, तर त्याच दिवशी निकाल जाहीर होतील. दरम्यान संख्याबळानुसार सत्ताधारी महायुतीच्या पारड्यात ८ जागा जाणार असून महाविकास आघाडीला एक जागा मिळणार आहे. ही एक जागा कोणाला जाते, याविषयी उत्सुकता आहे. सध्याच्या विधान परिषदेच्या ९ सदस्यांचा कार्यकाळ १३ मे रोजी संपणार आहे. निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर झाल्याने राजकीय पक्षातील इच्छुकांच्या हालचाली आपोआपच वाढल्या आहेत. मागच्या वेळी राज्यसभेसाठी उद्धव ठाकरे यांचा शिवसेना पक्ष हा प्रमुख दावेदार होता. पण तरीही त्यांनी ही जागा शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस आणि प्रामुख्याने शरद पवार यांच्यासाठी सोडली. काँग्रेसनेही पवारांना पाठिंबा दिला. आता विधान परिषदेवर उद्धव ठाकरे यांना पाठविण्याची मागणी शिवसेना उबाठा पक्षाकडून करण्यात येत आहे. साहजिकच काँग्रेसच्या अडचणी वाढल्या आहेत. तीनही पक्षांनी समन्वय साधत अधिकची दहा मते खेचून आणल्यास महाविकास आघाडीचे दोन जण विधान परिषदेवर जाऊ शकतात. मात्र यासाठी मोठी कसरत करावी लागणार आहे. विधान परिषदेचा एक आमदार निवडून येण्यासाठी २८ मतांचा कोटा आवश्यक आहे. महायुतीत भाजप (१३१ आमदार), एकनाथ शिंदे यांची शिवसेना (५७ आमदार) आणि अजित पवार यांची राष्ट्रवादी (४० आमदार) असे बलाबल पाहता महायुतीचे ८ उमेदवार सहज निवडून येऊ शकतात. तर महाविकास आघाडीचे एकूण संख्याबळ ४६ आहे. त्यामुळे त्यांचा केवळ एकच उमेदवार सहज निवडून येऊ शकतो. काँग्रेसने पाठिंबा नाही दिला तरी उद्धव ठाकरे हे सहज विधान परिषदेवर निवडून जाऊ शकतात. राज्यसभा निवडणुकीत काँग्रेसचा उमेदवार असावा व विधान परिषदेला मविआचा चेहरा उद्धव ठाकरे यांनी उमेदवारी करावी अशी काँग्रेस पक्षाची भूमिका होती. पण ज्येष्ठ नेते शरद पवार यांना मविआकडून राज्यसभेची उमेदवारी देण्यात आली. आता विधान परिषदेला जर उद्धव ठाकरे उमेदवार नसतील तर काँग्रेस पक्षाला उमेदवारी द्यावी, अशी आमची भूमिका आहे. विधान परिषदेची एक जागा ही काँग्रेसचे नेते राजीव सातव यांची होती. त्यांच्या निधनानंतर त्यांच्या



पत्नी प्रज्ञा सातव यांना काँग्रेसने उमेदवारी दिली होती. पण त्यांनी राजीनामा दिला. त्या जागेवर काँग्रेसच्या उमेदवाराला बिनविरोध निवडून दिले पाहिजे. यासाठी मुख्यमंत्र्यांनी बारामतीप्रमाणे संस्कृती व परंपरेचे पालन करावे, असे आवाहन सपकाळ यांनी केले आहे. विधान परिषदेच्या रिक्त जागेची निवडणूकही त्याच दिवशी, म्हणजे १२ मे रोजी होणार आहे उद्धव ठाकरे (शिवसेना - उबाठा), नीलम गोऱ्हे (शिवसेना), शशिकांत शिंदे (राष्ट्रवादी - शरद पवार गट), अमोल मिटकरी (राष्ट्रवादी - अजित पवार गट), दादाराव कैंचे (भाजप) , रणजितसिंह मोहिते-पाटील (भाजप), संजय केणेकर, (भाजप), संदिप जोशी (भाजप) आणि राजेश राठोड (काँग्रेस)

# विरोध करणाऱ्यांना दीर्घकाळ किंमत चुकवावी लागेल! महिला आरक्षणावरुन मोदींचा थेट इशारा

**वृत्तसंस्था/ नवी दिल्ली**

महिला आरक्षणावरुन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विरोधकांना धारेवर धरलं आहे. महिला आरक्षणाला विरोध करणाऱ्यांना याची किंमत प्रदीर्घकाळ चुकवावी लागेल, अशा शब्दांत पंतप्रधान मोदी यांनी विरोधकांना लक्ष्य केलं. महिलांच्या अधिकाऱ्यांना विरोध करणाऱ्यांना माफी मिळणार नाही, असंही मोदी यांनी लोकसभेत बोलताना सुनावलं. महिला आरक्षणावर लोकसभेत आज चर्चा होत आहे. याच विषयावर बोलताना पंतप्रधानांनी विरोधकांचा समाचार घेतला. कोणत्याही देशाच्या आयुष्यात असे काही निर्णायक क्षण येतात. त्यावेळी समाजाची मानसिकता आणि नेतृत्त्वाकडे असलेली त्या संधीचं सोनं करण्याची क्षमता देशाचं भविष्य बदलते. एका सशक्त देशाची निर्मिती करते. भारतीय लोकशाहीच्या इतिहासात हा क्षण तसाच आहे. भारत लोकशाहीची जन्मभूमि आहे. विकासाच्या यात्रेला एक नवा आयाम देण्याची पवित्र संधी आपल्याला मिळाली आहे. देशाच्या निम्म्या लोकसंख्येला राष्ट्र निर्माणाच्या निर्णय प्रक्रियेत सहभागी करण्याची संधी आपल्याला मिळाली, हे आपलं भाग्य आहे, असं मोदी म्हणाले. या महत्त्वाच्या आणि मोक्याच्या क्षणी खासदारांनी साथ द्यावी, असं आवाहन पंतप्रधानांनी केलं. आपण सगळे भारतीय एकत्रितपणे देशाला एक नवी दिशा देत आहोत, असं मोदींनी म्हटलं. आपण आपल्या शासन प्रणालीत अधिक संवेदनशीलता आणण्यासाठी प्रयत्न करत आहोत. या मंथनातून जे अमृत निघेल ते केवळ देशाच्या राजकीय स्वरुपाला वेगळा आकार देणार नाही, तर देशाची दिशा ठरवेल, देशाची परिस्थिती बदलेल, असा विश्वास मोदींनी व्यक्त केला. एका राष्ट्राच्या रुपात विचार करणं ही आपली जबाबदारी आहे. काश्मीर असो वा कन्याकुमारी असो, आपण ना तुकड्यांमध्ये विचार करु शकतो, ना निर्णय घेऊ शकतो. केवळ राजकीय लाभासाठी वादळ निर्माण केलं जात आहे. हा प्रकार चुकीचा आहे, असं मोदी म्हणाले. कोणत्याही राज्याचं महत्त्व कमी होणार नाही, याची ग्वाही मोदींनी लोकसभेत दिली. लोकसभेतील कोणत्याही राज्याचं महत्त्व घटणार नाही. काही जण केवळ राजकीय स्वार्थासाठी वादळ




निर्माण करत आहोत, अशा शब्दांत मोदींनी दक्षिणेकडील राज्यांना दिलासा दिला. जर गॅरेंटी शब्द हवा असेल तर मी त्या शब्दाचा वापर करतो. जर तुम्हाला आश्वासन शब्द हवा असेल तर मग ती त्याचा वापर करतो. तमिळमध्ये कोणता अधिक चांगला शब्द असेल तर तो बोलायलाही मी तयार आहे. कारण नियत साफ असेल तर शब्दछल करण्याची गरज भासत नाही, असं म्हणत मोदींनी दक्षिणेकडील राज्यांना दिलासा देण्याचा प्रयत्न केला.

# उडत्या मुंबईचे प्राक्तन



पठ्ठे बापूराव यांनी ङ्गमुंबई नगरी बडी बाका, जशी रावणाची दुसरी लंकाफ अशी सुरुवात असलेली ङ्गमुंबईची लावणीफ लिहिली त्यास साठ-सत्तर वर्षे होऊन गेली. या सहा-सात दशकांत ही मुंबई नगरी कशी घडत आणि बिघडत गेली हे साऱ्यांनीच पाहिले. ती घडल्याबाबतचे कौतुक करणाऱ्यांनी आणि त्यासाठी स्वतःची पाठ थोपटून घेणाऱ्यांनी ती कशी बिघडत गेली आहे... बिघडत चालली आहे, याकडे वेळीच लक्ष द्यायला हवे; अन्यथा वेळ निघून गेलेली असेल. कोणे एके काळी निवांत उपनगर असलेल्या गोरेगाव या मुंबईच्या एका उपनगरात संगीत कार्यक्रमाच्या नावाखाली आयोजित रेव्ह पार्टीत अमली पदार्थांच्या अतिसेवनामुळे एमबीएचा एक विद्यार्थी व एक विद्यार्थिनी अशा दोघांचा मृत्यू झाला. ही दुर्घटना म्हणजे बिघडलेल्या मुंबईचे रूप आहे. मुंबईच्या या बिघडलेल्या रूपाने अनेक प्रश्न उपस्थित केले आहेत. ते प्रश्न समाजाच्या नैतिकतेच्या मापदंडाचे आहेत, वैयक्तिक नैतिकतेचे आहेत, कुटुंबव्यवस्थेचे आहेत, हाती आलेल्या बेफाम पैशाचे आहेत, नफेखोरीचे आहेत, कायदा-सुव्यवस्थेचे आहेत, पोखरलेल्या यंत्रणांचे आहेत नि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे पोलिस नामक यंत्रणेच्या अकार्यक्षमतेचे आहेत. मुंबईतील वाहतूक नीट व्हावी, म्हणून या मायानगरीच्या पोटातून बोगद्यांचे रस्ते बांधले जात आहेत. गोरेगावमधील पार्टीत अमली पदार्थांच्या अतिसेवनाने दोघांचा झालेला मृत्यू ही एक दुर्घटना. ती घडली म्हणून असल्या पाट्यांमधील अंधारात, कर्णकर्कश संगीताच्या बेभान करणाऱ्या उन्मादात कसले वाह्यात प्रकार सुरू असतात हे पुन्हा एकदा उजेडात आले. ङ्गपुन्हा एकदाफ असे म्हणण्याचे कारण म्हणजे या अशा लाखालाखांची तिकिटे असलेल्या ङ्गकॉन्सर्टफमध्ये काय धंदे चालतात ते आजच्या शेंबड्या पोरांनाही ठाऊक असते. ज्या शहरात अगदी शाळा-महाविद्यालयांजवळच असलेल्या पानांच्या टपऱ्यांवर अमली पदार्थ हे लिमलेटच्या गोळ्या मिळाव्यात इतके सहज मिळत असतील त्या शहरांतील शेंबड्या पोरांना ङ्गकॉन्सर्टफमध्ये काय चालते याचे दिव्य ज्ञान असणारच ना! पण ज्यांच्या हाती या शहराची कायदा सुव्यवस्था आहे त्या मुंबई पोलिसांना हे दिव्य ज्ञान नसावे, याचेच आश्चर्य. गोरेगावातील या कार्यक्रमाला पोलिस, अग्निशमन दल, वाहतूक पोलिस, उत्पादन शुल्क विभाग यांची रीतसर परवानगी होती, हे मान्यच. पण अशा कार्यक्रमांना परवानगी देताना जे नियम घालून दिले जातात त्याची खरोखर अंमलबजावणी होत आहे की नाही, हे पाहण्यासाठी काहीच यंत्रणा नसावी? की ही मुद्दामहून केली जाणारी डोळेझाक? आणखी एक मुद्दा या कार्यक्रमाच्या आयोजकांना पुरवण्यात आलेल्या अमली पदार्थांचा. तर, ते पुरवणाऱ्या लखन नामक नरपुंगवास पोलिसांनी कल्याणमधून अटक केली आहे. याचे पिताश्री म्हणे रेशन माफिया आहेत. अशी ही माणसे साऱ्या यंत्रणा, पोलिस यांच्या नाकाखाली आपले सगळे धंदे चालू ठेवतातच कसे? या स्थितीत मुंबईची संभावना ङ्गउडती मुंबईफ अशी होऊ लागली तर त्यात नवल ते काय! ङ्गरेव्ह पाट्या म्हणजे धनिकांच्या बाळांचे धंदेफ अशा आत्मग्लानीत मुंबईच्या - खरे तर महाराष्ट्रासह देशातील कुठल्याच शहरातील, गावातील- लोकांनी आता राहू नये. पानटपऱ्यांवर मिळणारे अमली पदार्थ आणि रेव्ह पाट्यांत पुरवले जाणारे अमली पदार्थ यांत ङ्गगुणात्मकफ आणि किमतीत जमीन-अस्मानाचा फरक असेल, मात्र त्यांचा हेतू एकच - मन, मेंदू, शरीर यांना नशेमागे फरफटत नेणे. पोखरत जाणारे शरीर, पोखरत जाणारे पाकीट ही त्याची अपरिहार्य परिणती. नशेला मिळत असलेले ङ्गग्लॅमरफ हा त्यातील एक अतिशय गंभीर असा मुद्दा. या साऱ्या पार्श्वभूमीवर पालक, समाज यांच्यावर जबाबदारी येते ती अधिकाधिक सजग राहण्याची. त्यामुळे हे व्यसन केवळ कायदा-सुव्यवस्थेचा मुद्दा राहत नाही, तर तो देशाच्या भावी पिढीच्या भवितव्याचा मुद्दा होतो. ते सुरक्षित राखायचे असेल तर या विषवल्लीच्या मुळावरच घाव घालण्याची गरज अधोरेखित होते. गोरेगावसारख्या घटनेने अमली पदार्थांचे जाळे किती खोल पसरलेले आहे, याची नव्याने जाणीव झाली असेलच, तर मुळात हे विष पसरूच नये, यासाठी दक्ष राहायला हवे. त्यासाठी पोलिसांसह स्थानिक यंत्रणा व केंद्रीय यंत्रणा यांत समन्वय हवा. देशाचे शत्रू केवळ सीमेवर नसतात, माओवाद्यांसारखे देशांतर्गतही नसतात; अमली पदार्थांसारखे देश पोखरणारे शत्रूही असतात. त्यांचा वेळीच बीमोड व्हावा; अन्यथा वर म्हटल्याप्रमाणे वेळ निघून गेलेली असेल...

अ




The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

# मतदारसंघ फेररचनेशी महिला आरक्षण जोडणाऱ्या घटनादुरुस्तीला विरोध

■ नवी दिल्ली/वृत्तसंस्था

महिलांचे आरक्षण मतदारसंघांच्या फेररचनेशी जोडणाऱ्या घटनादुरुस्तीला विरोध करण्याचा निर्णय 'इंडिया' आघाडीने घेतला आहे. त्यामुळे विरोधकांच्या या एकजुटीवर गुरुवारी लोकसभेमध्ये मांडल्या जाणाऱ्या 'नारीशक्ती वंदन' घटनादुरुस्ती विधेयकाचे भवितव्य अवलंबून असेल. 'इंडिया' आघाडीतील तृणमूल काँग्रेस, द्रमुक, समाजवादी पक्ष अशा प्रमुख पक्षांचे खासदार मतदाना वेळी गैरहजर राहिले तरच केंद्र सरकारला हे महत्त्वाकांक्षी विधेयक मंजूर करून घेता येईल, ही बाब बुधवारी 'इंडिया' आघाडीच्या बैठकीनंतर स्पष्ट झाली.

लोकसभा मतदारसंघांची फेररचना करून २०२९मध्ये महिलांसाठी ३३ टक्के जागा राखीव ठेवण्याचा कायदा लागू करण्याचा निर्धार केंद्र सरकारने केला आहे. त्यासाठी १०७ वी घटनादुरुस्ती विधेयक गुरुवारपासून तीन दिवस होणाऱ्या संसदेच्या अधिवेशनात मांडले जाणार आहे. घटनादुरुस्तीसाठी विधेयक संमतीवेळी सभागृहात उपस्थित सदस्यांच्या दोनतृतीयांश सदस्यांच्या पाठिंब्यानेच विधेयक मंजूर केले जाऊ शकते. लोकसभेच्या ५४३ सदस्यांपैकी



सत्ताधारी 'एनडीए'कडे २९३ ते संख्याबळ असून विरोधी 'इंडिया' आघाडीकडे २३२ सदस्य आहेत. दोन तृतीयांश बहुमतासाठी ३६४ सदस्यांच्या पाठिंब्याची गरज लागेल. कुठल्याही आघाडीत नसलेल्या सदस्यांची संख्या १६ आहे.

'इंडिया' आघाडीतील सर्वच्या सर्व सदस्यांनी विधेयकाविरोधात मतदान केले तर हे विधेयक फेटाळले जाईल. अशा परिस्थितीत 'इंडिया' आघाडीतील काँग्रेस वगळता इतर मोठे पक्ष समाजवादी पक्ष (३७), तृणमूल काँग्रेस (२८) व द्रमुक (२२) असे मिळून ८७ सदस्यांनी मतदानात भाग घेतला नाही तसेच, विरोधकांमधील इतर सदस्य गैरहजर राहिले वा त्यांनी विधेयकाच्या बाजूने मतदान केले तरच घटनादुरुस्ती संमत होऊ शकते. मात्र, 'इंडिया' आघाडीतील घटक पक्षांनी बुधवारी झालेल्या बैठकीनंतर घटनादुरुस्ती विधेयकाविरोधात मतदान करणार असल्याचे स्पष्ट केले आहे. 'इंडिया' आघाडीचे ऐक्य कायम राहिले तर केंद्र सरकारच्या पदरी मोठी निराशा येण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

'इंडिया' आघाडीच्या वतीने भूमिका स्पष्ट करताना काँग्रेसचे महासचिव जयराम रमेश यांनी सांगितले की, आम्ही (विरोधकांनी) मागणी केली होती की, महिला आरक्षण २०२४ च्या लोकसभा निवडणुकांपासूनच लागू करण्यात यावे. आमच्या या मागणीकडे दुर्लक्ष करण्यात आले. आता मात्र, निवडणुका सुरू असतानाच केंद्र सरकारने अचानक घटनादुरुस्तीचा निर्णय घेतला आहे. पश्चिम बंगाल आणि तमिळनाडूमध्ये भाजपचा पराभव अटळ आहे. निवडणुका ऐन भरात असतानाच त्यांनी ही तीन विधेयके आणली आहेत. केंद्र सरकारने मतदारसंघांची फेररचना आणि महिला आरक्षण यांची सांगड घातली आहे. फेररचना आयोग हे भाजपच्या हाती बहुमत मिळवून देणारे हत्यार बनले आहे. लोकसभेची सध्याची सदस्यसंख्या कायम ठेवूनच महिलांना एकतृतीयांश आरक्षण देण्यात यावे अशी आमची मागणी आहे, अशी भूमिका रमेश यांनी विशद केली.

घटनादुरुस्तीमध्ये महिला आरक्षण व लोकसभा मतदारसंघांची फेररचना व संख्येतील वाढीची तरतूद केली आहे. 'इंडिया आघाडीने महिला आरक्षणाला विरोध नसल्याचे स्पष्ट केले असले तरी, मतदारसंघाच्या फेररचनेला विरोध केला तर महिला आरक्षणालाही विरोध केल्याचा आरोप भाजपकडून होऊ शकतो, त्यामुळे या घटनादुरुस्ती विधेयकाविरोधात मतदान करणे हे 'इंडिया आघाडीसाठी तारेवरील कसरत असल्याचे मानले जात आहे. मतदारसंघांच्या फेररचनेनंतर लोकसभेच्या जागांची संख्या ५४३ वरून ८५० होणार आहे. मात्र, ही फेररचना न करता ५४३ जागांमध्येच महिलांना ३३ टक्के आरक्षण लागू करा, अशी मागणी लोकसभेत 'इंडिया' आघाडीकडून विधेयकावरील चर्चेमध्ये केली जाईल असे घटक पक्षांतील काही सदस्यांनी सांगितले.

## विरोधकांची रणनीती

काँग्रेसचे अध्यक्ष व राज्यसभेतील विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे यांच्या दिल्लीतील निवासस्थानी झालेल्या 'इंडिया' आघाडीमध्ये संसदेच्या अधिवेशनातील रणनीती निश्चित करण्यात आली. 'आम्ही महिला आरक्षणाच्या बाजूने आहोत. मात्र, मतदारसंघांच्या फेररचनेच्या बाबतीत केंद्र सरकार लबाडी करत आहेत. आम्ही या विधेयकाला विरोध करत आहोत. सर्व विरोधी पक्षांनी मिळून हा निर्णय घेतला आहे. आम्ही महिला आरक्षणाच्या विरोधात नाही. जनगणनेबाबत कोणतीही स्पष्टता नाही. आम्ही मतदारसंघांच्या फेररचनेच्या विधेयकाच्या निश्चितपणे विरोधात आहोत, असे खरगे यांनी सांगितले.

# सम्राट चौधरी यांची बिहारच्या मुख्यमंत्रिपदी शपथ

■ पाटणा, वृत्तसंस्था :

भाजप नेते सम्राट चौधरी यांनी बिहारच्या मुख्यमंत्रीपदाची बुधवारी शपथ घेतली. राज्याचे ते २४ वे मुख्यमंत्री असून, भाजपकडे पहिल्यांदाच हे पद आले आहे. लोकभवन येथे राज्यपाल सईद अता हसनिन यांनी त्यांना शपथ दिली. यावेळी संयुक्त जनता दलाचे बिजेंद्र प्रसाद यादव आणि विजय कुमार चौधरी यांनीही मंत्रिपदाची शपथ घेतली. नव्या सरकारमध्ये ते उपमुख्यमंत्री असतील.

यावेळी जनता दलाचे अध्यक्ष नितीश कुमार, भाजपचे माजी अध्यक्ष जे.पी.नड्डा, केंद्रीय मंत्री चिराग पासवान यांची उपस्थिती होती. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी चौधरी यांचे अभिनंदन केले आहे. समर्पित भावनेने काम करणारे व्यक्तीमत्व असल्याने राज्याला त्याचा फायदा होईल असे पंतप्रधानांनी नमूद केले. मावळते मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी चौधरी यांचे अभिनंदन करत, बिहारचा वेगाने विकास होईल असा विश्वास व्यक्त केला. ही परमेश्वराची कृपा आहे अशी भावना सम्राट चौधरी यांचे वडिल शकुनी चौधरी यांनी शपथविधीनंतर व्यक्त केली. शकुनी चौधरी हे सात वेळा आमदार होते. विरोधी पक्षनेते तेजस्वी यादव यांनी सम्राट चौधरी यांचे अभिनंदन करताना, नितीश कुमार यांना सत्तेतून बाजूला करण्याची प्रतीज्ञा घेतली होती ती पूर्ण झाली असा टोला लगावला. तसेच राज्यात रालोआची २१ वर्षे सत्ता असताना देखील अपेक्षित विकास झाला नाही हे वास्तव नव्या मुख्यमंत्र्यांना माहित



आहे असेही तेजस्वी यांनी स्पष्ट केले. सम्राट चौधरी यांच्या नेतृत्वाखाली भाजपला राज्यात स्वतंत्रपणे नेतृत्व करण्याची पहिली संधी मिळाली आहे, ज्यामुळे पक्षाच्या दीर्घकालीन रणनीतीला बळ मिळेल. यापूर्वी नितीश कुमार यांच्या नेतृत्वाखालील आघाडी सरकारमध्ये भाजप भागीदार म्हणून कार्यरत होता, मात्र आता सत्तेचा केंद्रबिंदू बदलला आहे. विशेषतः ओबीसी, दलित आणि अल्पसंख्याक समुदायांना समाविष्ट करून व्यापक राजकीय संतुलन साधण्यावर भर दिला जाईल. गेली तीन दशके राजकारणात असलेल्या ५७ वर्षीय सम्राट चौधरी यांनी ९ वर्षांपूर्वी भाजपमध्ये प्रवेश केला. तर दोन्ही उपमुख्यमंत्री हे नितीशकुमार यांचे विश्वासू मानले जातात. मंत्रिमंडळ विस्तार लवकरच केला जाईल असे राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या सुत्रांनी सांगितले. त्यात जातीय समीकरणे महत्त्वाची ठरतील. मुख्यमंत्री चौधरी हे इतर मागासवर्गीय असलेल्या कोयरी समुदायातून येतात. तर विजयकुमार चौधरी हे खुल्या गटातील भुमीहार समूदायाचे प्रतिनिधीत्व करतात. दुसरे उपमुख्यमंत्री असलेले बिजेंद्र प्रसाद यादव हे राज्यात इतर मागासवर्गीय समुदायातील सर्वात मोठा जातसमुह असलेल्या यादव समुदायातून येतात.

## जागतिक स्तरावर महाराष्ट्राच्या पर्यटनाचे ब्रँडिंग करणार

■ मुंबई/वृत्तसंस्था

महाराष्ट्र राज्याच्या पर्यटन स्थळांची देश-विदेशात व्यापक प्रचार आणि प्रसिद्धी करण्यासाठी पर्यटन विभागाने सर्वसमावेशक 'ब्रँडिंग आणि मार्केटिंग प्लॅन' तयार केला आहे यामुळे जागतिक स्तरावर महाराष्ट्राचे ब्रँडींग होणार आहे. हा आराखडा अधिक सर्वसमावेशक करण्याचे निर्देश पर्यटन मंत्री शंभूराज देसाई यांनी दिले.

सह्याद्री अतिथिगृहात पर्यटन विभागाच्या मीडिया प्लॅनसंदर्भात आयोजित बैठकीत पर्यटन मंत्री शंभूराज देसाई बोलत होते. यावेळी पर्यटन विभागाचे प्रधान सचिव संजय खंदारे, पर्यटन संचालनालयाचे संचालक डॉ. बी. एन. पाटील, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक निलेश गटणे, पर्यटन विभागाचे उपसचिव संतोष रोकडे, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे महाव्यवस्थापक चंद्रशेखर जयस्वाल, पर्यटन विभागाचे सहसंचालक संतोष जाधव यावेळी उपस्थित होते.

देसाई म्हणाले की, "राज्यातील ऐतिहासिक वास्तू, गड-किल्ले, समुद्रकिनारे, तीर्थक्षेत्रे, आरोग्य, जंगले व प्रसिध्द ठिकाणे, हंगामी पर्यटन, खाद्यसंस्कृती, लोकसंस्कृती अशा प्रत्येक घटकातील पर्यटन स्थळांची माहिती आधुनिक माध्यमांतून लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी ब्रँडिंग करण्यात यावे.

या मीडिया प्लॅनमध्ये पर्यटन विभागामार्फत २०२६-२७ या आर्थिक वर्षात नियोजित असलेल्या तरतुदीतून जागतिक, आंतरराज्य व राज्यात पर्यटन विभागाचा सर्वसमावेशक आराखडा तयार आहे.

# अमेरिकेचा संदेश घेऊन असीम मुनीर इराणमध्ये दाखल

■ नवी दिल्ली/वृत्तसंस्था

लष्करप्रमुख असीम मुनीर यांच्या नेतृत्वाखाली पाकिस्तानी शिष्टमंडळ बुधवारी इराणमध्ये दाखल झाले. अमेरिका आणि इराण यांच्या शांतता चर्चेसाठी पाकिस्तान मध्यस्थी करत आहे, त्याच प्रयत्नाचा हा एक भाग समजला जातो. मुनीर यांचे शिष्टमंडळ अमेरिकेचा संदेश घेऊनच इराणमध्ये दाखल झाल्याची देखील माहिती समोर आली आहे. यावेळी अमेरिका आणि इराण यांच्यातील पुढच्या चर्चेचा दिवस ठरण्याची शक्यता आहे.

असीम मुनीर यांच्याबरोबर पाकिस्तानी मंत्री मोहसीन नख्वी देखील उपस्थित आहेत. इंटर सर्व्हिस पब्लिक रिलेशन (आएसपीआर) च्या माध्यम विभागाने प्रसिद्ध केलेल्या माहितीनुसार, लष्करप्रमुख मुनीर आणि मंत्री नख्वी यांचे शिष्टमंडळ इराणमध्ये दाखल झाले आहे, अशी माहिती त्यांनी प्रसिद्ध केली आहे. मुनीर यांच्या शिष्टमंडळाचे तेहरान विमानतळावर इराणचे परराष्ट्रमंत्री सय्यद अब्बास अराघची यांनी स्वागत केले. अमेरिका आणि इराण यांच्यातील चर्चेच्या दुसऱ्या फेरीपूर्वी पाकिस्तानच्या तेहरान येथील बैठकीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

गेल्या आठवड्यात अमेरिका आणि इराण यांच्यात इस्लामाबाद येथे झालेल्या चर्चेत कोणताही ठोस तोडगा निघालेला नाही. यानंतर दोन्ही देशांमध्ये होणाऱ्या दुसऱ्या चर्चेकडे जगाचे लक्ष लागले आहे. अशात पाकिस्तानने इराणला दिलेली भेट महत्वाची मानली जात आहे. मुनीर इराणमध्ये अमेरिकेचा संदेश घेऊन



दाखल झाल्याचेही सांगितले जात आहे. आता हा संदेश नेमका काय याबाबत माहिती समोर आलेली नाही. पण, अमेरिका आणि इराण यांच्यातील वाटाघाटीतला हा एक महत्वाचा टप्पा मानला जात आहे.

डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणविरोधातील युद्ध जवळपास समाप्त झाल्याचा उल्लेख बुधवारी वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीत केला. दोन्ही देशांतील वाटाघाटी जवळपास पूर्णत्वास गेल्याचे संकेतही ट्रम्प यांनी या मुलाखतीत दिले. ट्रम्प यांच्या युद्ध समाप्तीच्या वक्तव्यानंतर या संघर्षावर तोडगा काढण्यासाठी मध्यस्थीची भूमिका बजावणाऱ्या पाकिस्तानचे शिष्टमंडळ आज इराणमध्ये दाखल झाले आहे. त्यामुळे मुनीर यांच्या शिष्टमंडळाची इराणमध्ये नेमकी काय चर्चा होते याकडे जगाचे लक्ष लागले आहे. "मी होर्मुझ सामुद्रधुनी कायमची खुली करतोय यामुळे चीन खूप खूश आहे. हे मी त्यांच्यासाठी आणि संपूर्ण जगासाठी करतोय. ही परिस्थिती पुन्हा उत्पन्न होणार नाही. इराणला शस्त्रपुरवठा करणार नाही यासाठी त्यांनी सहमती दर्शवली आहे. मी काही दिवसांत तिथं (चीनमध्ये) जाईन त्यावेळी अध्यक्ष शी जिंगपिंग मला कडाडून मिठी मारतील. आम्ही फार छान पद्धतीने एकत्र काम करतोय.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



## टीसीएस छळवणूक प्रकरण..

# मॅनेजर अश्विनी चैनानींची रवानगी जेलमध्ये

**नाशिक/वृत्तसंस्था**

नामांकित टीसीएस या बहुराष्ट्रीय कंपनीत मागील चार वर्षांत महिलांवर अन्याय, अत्याचार, धर्मांतराचा प्रयत्न आणि मांसाहार करण्यासाठी भाग पाडणे असे गंभीर प्रकार घडले. या प्रकरणातील पीडितेच्या तक्रारींकडे दुर्लक्ष केल्याच्या प्रकरणात पुणे येथील ऑपरेशन विभागाच्या व्यवस्थापिका अश्विनी चैनानी यांची न्यायालयाने बुधवारी न्यायालयीन कोठडीत रवानगी केली.

टीसीएस नाशिकमधील गैरप्रकारांबाबत प्राप्त झालेल्या तक्रारींवरून पोलिसांनी कंपनीच्या आठ अधिकारी व कर्मचाऱ्यांविरुद्ध एकूण नऊ गुन्हे दाखल केले आहेत. संशयितांमध्ये सहा पुरुष आणि दोन महिलांचा समावेश आहे. पोलीस कोठडीची मुदत संपल्याने ऑपरेशन प्रमुख अश्विनी चैनानी (५१, लुलानगर, पुणे) यांना बुधवारी न्यायालयात हजर करण्यात आले होते. पीडितेचा विनयभंग आणि वैयक्तिक आयुष्याबाबत लज्जास्पद वक्तव्य केल्याप्रकरणी शाहरूखहुसेन शौकत कुरेशी आणि रझा रफीक मेमन हे दोन संशयित आधीच न्यायालयीन कोठडीत आहेत.



पीडितेने तक्रार करूनही चैनानी यांनी संशयितांना प्रतिबंध न करता उलट त्यांच्या कृत्यास चिथावणी दिली. संशयितांची पाठराखण करत 'तुमको क्यू हायलाईट होना है, जाने दो, छोड दो' असे पीडितेला सांगून त्यांना पाठिंबा दिल्याची माहिती सरकारी पक्षातर्फे देण्यात आली. संशयित वरिष्ठ पदावर असल्याने त्यांनी पुराव्यांत फेरफार करू नये यासाठी पोलीस कोठडीचा हक्क अबाधित राखून त्यांना १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी देण्याची मागणी करण्यात आली. न्यायालयाने ही मागणी मान्य करत चैनानी यांना १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली. दरम्यान, या प्रकरणातील अन्य दोन संशयितांना जामीन मिळावा म्हणून न्यायालयात अर्ज सादर करण्यात आल्याची माहिती बचाव पक्षाचे ॲड. राहुल कासलीवाल यांनी दिली. टीसीएसच्या नाशिक येथील कंपनीत घडणाऱ्या गैरप्रकारांविषयी पीडितेने ईमेल आणि दूरध्वनीद्वारे दाद मागितली होती. कंपनीतील वरिष्ठ आणि कर्मचाऱ्यांमध्ये यासंदर्भात जवळपास ७८ ईमेलद्वारे माहितीचे आदान-प्रदान झाल्याचे मागील सुनावणीत न्यायालयात सांगण्यात आले होते. या तक्रारींची वेळीच दखल घेतली गेली असती, तर हे गैरप्रकार रोखता आले असते. या सर्व ईमेलचे विश्लेषण करण्यासाठी अश्विनी चैनानी यांच्या पोलीस कोठडीत वाढ करण्याची मागणी सरकारी पक्षाने केली होती. या गुन्ह्याचा तपास प्राथमिक स्तरावर असून, साक्षीदारांचे सविस्तर जबाब नोंदवणे व पुरावे गोळा करणे अद्याप बाकी आहे. तपासादरम्यान चैनानी यांनी सहकार्य केले नसून त्यांनी उडवाउडवीची उत्तरे दिल्याचे समोर आले आहे. गुन्ह्याचा सखोल तपास करून विहित मुदतीत न्यायालयात अंतिम अहवाल सादर करायचा असल्याने, पोलीस कोठडीचा हक्क अबाधित राखून चैनानी यांना न्यायालयीन कोठडीत ठेवावे अशी मागणी तपास यंत्रणेकडून करण्यात आली.

# मालेगावात किरकोळ वादातून मित्राची हत्या; दोघा संशयीतांना अटक

**मालेगाव/वृत्तसंस्था**

मित्रांमध्ये झालेल्या किरकोळ वादाचे रूपांतर भांडणात होऊन एका तरुणाला त्यात आपला जीव गमवावा लागल्याची धक्कादायक घटना मालेगाव तालुक्यातील दाभाडीच्या रोकडोबा नगरात घडली आहे. अनिल युवराज जाधव असे मृत तरुणाचे नाव असून, याप्रकरणी छावणी पोलीस ठाण्यात हत्येचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी याप्रकरणी दोन संशयितांना लागलीच अटक केली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, गेल्या १३ एप्रिल रोजी सायंकाळी ६ वाजेच्या सुमारास अनिल जाधव हा तरुण घरातून बाहेर पडला होता. बराच वेळ होऊनही तो घरी न परतल्याने त्याचा भाऊ स्वप्नील याने रात्री ८ वाजेच्या सुमारास अनिलच्या मोबाईलवर संपर्क साधला. त्यावेळी फोन उचलला गेला, मात्र अनिल यांच्याशी बोलणे होण्याऐवजी पलीकडून भांडण आणि शिवीगाळ होत असल्याचा आवाज स्वप्नील यास ऐकू आला. मोबाईलवरून ऐकलेल्या भांडणाच्या आवाजावरून भाऊ संकटात असल्याचा अंदाज बांधत स्वप्नीलने घराबाहेर पडत त्याचा शोध सुरू केला. शोध घेत असताना रोकडोबा नगर येथील वीर एकलव्य चौकातील हनुमान मंदिराजवळ अनिल हा रक्ताच्या थारोळ्यात पडलेला त्याला दिसला. घटनास्थळी अनिल याचे मित्र अजय रामचंद्र मोरे व सुनील बाळू गायकवाड (दोघे रा. रोकडोबा नगर) हे उपस्थित होते. स्वप्नील याला पाहताच संशयीत अजय याने हातातील लाकडी दांडका फेकून दिला आणि दोघांनीही तेथून पलायन केले. किरकोळ कारणावरून झालेल्या वादातून या दोघांनी अनिल यास लाकडी दांडक्याने बेदम मारहाण केल्याचा संशय स्वप्रिल यास आला. उपचारादरम्यान मृत्यू जखमी अनिल यास तातडीने मालेगाव येथील सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र,प्रकृती चिंताजनक असल्याने त्यास धुळे येथील जिल्हा व खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यानंतर पुन्हा मालेगावमधील एका खाजगी रुग्णालयात त्याला हलविण्यात आले. मात्र, मंगळवारी त्याचे निधन झाले.

# जळगाव : एटीएम मशीन पळवणाऱ्या टोळीचा पर्दाफाश; दोन संशयित पोलिसांच्या ताब्यात

**जळगाव/वृत्तसंस्था**



शहरातील एका खासगी बँकेचे एटीएम मशीन पळवून नेणाऱ्या आंतरराज्यीय सराईत गुन्हेगार टोळीचा स्थानिक गुन्हे शाखेने पर्दाफाश केला असून, दोन संशयितांना अटक करण्यात आली आहे. या कारवाईमुळे महाराष्ट्रासह झारखंड तसेच उत्तर प्रदेशात सक्रिय असलेल्या गुन्हेगारी जाळ्याचा उलगडा झाला असून, त्यांच्याकडून आणखी काही गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे.

जळगाव शहरातील पोलन पेठ परिसरातील सत्यम प्लाझा संकुलातील इक्विटास स्मॉल फायनान्स बँकेचे एटीएम मशीन चोरीच्या मालवाहू वाहनातून पळवून नेल्याची घटना तीन एप्रिलला घडली होती. अज्ञात चोरट्यांनी त्यातील सुमारे सात लाखांची रोकड लंपास केल्याप्रकरणी जळगाव शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल असताना, पोलीस अधीक्षकांनी स्थानिक गुन्हे शाखेला समांतर तपास करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार पोलीस निरीक्षक राहुल गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली पथक काही दिवसांपासून कार्यरत होते. तपासादरम्यान पोलन पेठेतील एटीएम पळवून नेणारी टोळी पुन्हा जळगाव शहरात येणार असल्याची खात्रीलायक माहिती पोलिसांना मिळाली होती. या माहितीच्या आधारे पोलिसांनी मंगळवारी मन्यारखेडा रस्त्यावर सापळा रचला. पथकाने संशयितांच्या हालचालींवर लक्ष ठेवून योग्य वेळी कारवाई करत दोन जणांना ताब्यात घेतले. चौकशीत त्यांनी फरहान, अकबर आणि मुजाहीद या अन्य तीन साथीदारांसह जळगावसह इतर राज्यांमध्ये एटीएम मशिन फोडून चोरी केल्याची कबुली दिली. अटक करण्यात आलेल्या दोन संशयितांमध्ये मोबीन आलम मिला (२८, रा. बेगी नाजर, ता. नकूर, जि. सहारनपूर, उत्तर प्रदेश) आणि अब्दुल करीम नूर हसन (५२, रा. तितरोद, ता. नकूर, जि. सहारनपूर, उत्तर प्रदेश) यांचा समावेश आहे. या दोघांवर यापूर्वीही महाराष्ट्र, झारखंड आणि उत्तर प्रदेशातील विविध पोलीस ठाण्यांमध्ये गंभीर गुन्हे दाखल असून, ते सराईत गुन्हेगार असल्याची माहिती तपासात समोर आली आहे. अन्य तिघांचा शोध पोलिसांकडून घेण्यात येत आहे.

# मालेगावात धुमाकूळ घालणाऱ्या 'इराणी टोळी'चा छडा; बिदरमधून संशयीताला बेड्या

**मालेगाव/वृत्तसंस्था**

मालेगाव शहरासह परिसरात महिलांच्या गळ्यातील सोनसाखळी खेचत धुमाकूळ घालणाऱ्या आंतरराज्य टोळीचा छडा लावण्यात मालेगाव पोलिसांना मोठे यश आले आहे. पोलिसांनी कर्नाटक राज्यातील बिदर येथून मुख्य संशयीताला बेड्या ठोकल्या आहेत. या कारवाईमुळे १० गुन्हे उघडकीस आले असून आणखी काही गुन्ह्यांचा देखील छडा लागण्याची शक्यता आहे.

१ मार्च २०२६ रोजी मालेगावच्या सटाणा नाका परिसरात एका महिलेची ३ तोळ्यांची सोन्याची पोत दुचाकीवरून भरधाव वेगाने आलेल्या चोरट्यांनी हिसकावून नेली होती.



सोनसाखळी चोरीच्या वाढत्या घटनांच्या पार्श्वभूमीवर पोलिसांकडून विशेष तपास पथके गठित केली गेली होती. तांत्रिक विश्लेषण आणि सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे कर्नाटक राज्यातील बिदर येथील 'इराणी मोहल्ला' परिसरात संशयीत लपल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने बिदर येथे ५ दिवस वेशांतर करून पाळत ठेवली आणि मुस्तफा अली इसा अली (२०, मूळ रा. भुसावळ) याला शिताफीने ताब्यात घेतले.

ताब्यात घेतलेल्या मुस्तफा अली याने आपल्या साथीदारांसह मालेगाव शहरात भरधाव वेगाने मोटारसायकल चालवत काही महिलांच्या गळ्यातील दागिने हिसकावून नेल्याची कबुली दिली. त्यानुसार मालेगावच्या छावणी पोलीस ठाण्यात दाखल असलेले ६, कॅम्प पोलीस ठाण्यात दाखल असलेले ३ व येवला पोलीस ठाण्यात दाखल असलेला एक असे एकूण १० गुन्हे उघडकीस आले आहेत. संशयीत चोरटे गुन्हे करण्यासाठी प्रामुख्याने रॉयल एनफिल्डची 'हन्टर' आणि बजाज कंपनीची 'पल्सर एन एस' यांसारख्या वेगवान गाड्यांचा वापर करत असत. मुस्तफा अली याने सादिक अली इबादत अली, (रा. भुसावळ, जि. जळगाव), भोला सज्जाद अली,( रा. भापोळ, मध्यप्रदेश), अब्बास अली इबादत अली, (रा. भुसावळ, जि. जळगाव) व अहिल्या नगर जिल्ह्यातील श्रीरामपुर येथील एक अशा आणखी चार साथीदारांची नावे सांगितली. हे संशयीत महाराष्ट्र आणि मध्य प्रदेशात विविध गुन्ह्यांमध्ये फरार असल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले.

# RCB चा 'रॉयल' थाट! लखनौचा धुव्वा उडवत गुणतालिकेत गाठलं अव्वल स्थान

■ मुंबई, वृत्तसंस्था :

आयपीएल २०२६ स्पर्धेतील २३ वा सामना रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू आणि लखनौ सुपर जायंट्स या दोन्ही संघांमध्ये पार पडला. बंगळुरूतील एम चिन्नास्वामी स्टेडियमवर २०० पेक्षा अधिक धावांचा डोंगर उभारला जातो. पण रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघातील गोलंदाजांना श्रेय द्यावं लागेल. एकापेक्षा एक स्टार फलंदाजांची फौज असलेल्या लखनौ सुपर जायंट्स संघाचा डाव अवघ्या १४६ धावांवर संपुष्टात आणला. त्यानंतर फलंदाजांनी आपलं काम पूर्ण केलं. विराट कोहली, रजत पाटीदार आणि जितेश शर्मा यांनी केलेल्या दमदार फटकेबाजीच्या बळावर रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाने १४७ धावांचे आव्हान ५ गडी राखून पूर्ण केले आणि दमदार विजय मिळवला.

या सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. प्रथम




फलंदाजी करण्यासाठी आलेल्या लखनौच्या फलंदाजांना हवी तशी सुरुवात करून देता आली नाही. सलामीला आलेल्या मिचेल मार्शने ४० धावा केल्या. तर एडन मारक्रम अवघ्या १२ धावा करून माघारी परतला. कर्णधार ऋषभ पंत पुन्हा एकदा फ्लॉप ठरला. तो १ धाव करून माघारी परतला. तर निकोलस पूरन देखील १ धाव करून बाद झाला. शेवटी आयुष बदोनीने ३८ धावांचे बहुमूल्य योगदान दिले. गेल्या सामन्यात अर्धशतकी खेळी करून विजय मिळवून देणाऱ्या मुकुल चौधरीने या सामन्यात ३९ धावांचे योगदान दिले. पण लखनौचा डाव १४६ धावांवर आटोपला.

रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाला हा सामना जिंकण्यासाठी १४७ धावा करायच्या होत्या. या धावांचा पाठलाग करण्यासाठी आलेल्या रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाला सुरुवातीलाच मोठा धक्का बसला. फिल सॉल्ट अवघ्या ७ धावा करून माघारी परतला. विराट कोहली या सामन्यात इम्पॅक्ट प्लेअर म्हणून फलंदाजीला आला. त्याने ३४ चेंडूत ६ चौकार आणि १ षटकाराचा साहाय्याने ४९ धावांची खेळी केली.

देवदत्त पडिक्कलने १०, रजत पाटीदारने २७, जितेश शर्मानि २३ धावांची खेळी केली. तर शेवटी टीम डेव्हिड आणि रोमारिओ शेफर्डने प्रत्येकी १४-१४ धावांची खेळी करून रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाला २९ चेंडू शिल्लक ठेवून आणि ५ गडी राखून विजय मिळवून दिला.

## ॲटलेटिको माद्रिदचा उपांत्य फेरीत प्रवेश



■ माद्रिद/वृत्तसंस्था

स्पेनमधील दोन बलाढ्य क्लबमध्ये झालेल्या 'युएफा' चॅम्पियन्स लीग फुटबॉलच्या उपांत्यपूर्व फेरीतील लढतीत ॲटलेटिको माद्रिदने बार्सिलोनावर सरशी साधली. पहिल्या टप्प्यातील सामना ०-२ असा गमावल्यानंतर बार्सिलोनाने दुसऱ्या टप्प्यातील लढतीत पुनरागमनासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले. त्यांनी या सामन्यात २-१ असा विजयही मिळवला. मात्र, दोन टप्प्यांतील लढतींअंती ॲटलेटिकोने एकूण ३-२ अशा गोलफरकाने बाजी मारत तब्बल नऊ वर्षांनंतर चॅम्पियन्स लीगची उपांत्य फेरी गाठली.

सलग दुसऱ्या वर्षी उपांत्य फेरी गाठण्यासाठी प्रयत्नशील असणाऱ्या बार्सिलोनाने दुसऱ्या टप्प्यातील लढतीत संघर्ष केला. दोन गोलची पिछाडी भरून काढण्यातही त्यांना यश आले. युवा आक्रमकपटू लामिन यमाल(चौथ्या मिनिटाला) आणि आघाडीपटू फेरान टोरेस (२४व्या मिनिटाला) यांनी गोल करत एकूण लढतीत बार्सिलोनाला २-२ अशी बरोबरी करून दिली. मात्र, ३१व्या मिनिटाला मार्कोस लोरेन्टेच्या पासवर ॲडेमोला लूकमनने गोल नोंदवत ॲटलेटिकोला पुन्हा एकूण लढतीत ३-२ असे आघाडीवर नेले. यानंतर बार्सिलोनाने चेंडूवर ताबा राखताना गोलच्या काही संधी निर्माण केल्या. बार्सिलोनाचे अन्य प्रयत्न ॲटलेटिकोचा बदली गोलरक्षक जुआन मुसोने परतवून लावले.

दुसरीकडे, पॅरिस सेंट-जर्मेनच्या चॅम्पियन्स लीगचे जेतेपद राखण्याच्या आशा कायम आहेत. सेंट-जर्मेनने दुसऱ्या टप्प्यातील लढतीत लिव्हरपूलवर २-० असा विजय मिळवला. त्याआधी पहिल्या टप्प्यातील लढतही सेंट-जर्मेनने २-० अशीच जिंकली होती.

## बॅडमिंटनपटू व्हिक्टर ॲक्सल्सेनची निवृत्ती

■ मुंबई/वृत्तसंस्था

वृत्तसंस्था, नवी दिल्ली

दोन वेळचा ऑलिम्पिक आणि जागतिक विजेता डेन्मार्कचा बॅडमिंटनपटू व्हिक्टर ॲक्सल्सेनने वयाच्या ३२ व्या वर्षी निवृत्तीची घोषणा केली आहे. गेल्या काही काळापासून दुखापतींनी त्रस्त असलेल्या ॲक्सेल्सेनने 'शरीरच आता थांबायला सांगत आहे,' असे म्हणत बॅडमिंटनला अलविदा करण्याचा निर्णय जाहीर केला.



ॲक्सल्सेन पाठीच्या त्रासामुळे गेल्या वर्षी ऑक्टोबरपासून स्पर्धात्मक बॅडमिंटनपासून दूर आहे. या त्रासामुळे त्याच्यावर शस्त्रक्रिया करावी लागली होती आणि त्यानंतर तो तीव्र वेदनांनी त्रस्त होता. तीन वेळचा युरोपीय विजेता असलेल्या ॲक्सल्सेन याने 'बॅडमिंटन युरोप'शी बोलताना बुधवारी निवृत्तीच्या निर्णयाची घोषणा केली. "गेल्या काही काळापासून पाठीच्या दुखण्याशी झुंज देत आहे. गेल्या वर्षी एप्रिलमध्ये शस्त्रक्रिया झाल्यानंतर आणि दीर्घ पुनर्वसन प्रक्रियेतून गेल्यानंतरही, दुर्दैवाने ऑक्टोबरमध्ये मला पुन्हा त्रास सुरू झाला. तेव्हापासून आवश्यक असलेल्या पातळीवर खेळणे किंवा सराव करणे शक्य झाले नाही. वेदनांमुळे मी सराव करू शकलो नाही आणि म्हणूनच मला हा अत्यंत कठीण निर्णय घेण्यास भाग पडले," असे ॲक्सल्सेन म्हणाला.

ॲक्सल्सेनने सलग १८३ आठवडे जागतिक क्रमवारीत अग्रस्थान राखले होते. दम्यासारख्या आजाराचा सामना करत ॲक्सल्सेनने टोक्यो आणि पॅरिस ऑलिम्पिकमध्ये सलग सुवर्णपदके जिंकली. तसेच २०१७ व २०२२ मध्ये तो जगज्जेता ठरला. याशिवाय युरोपीय अजिंक्यपद स्पर्धेमध्ये सुवर्णपदक जिंकणाऱ्या डेन्मार्क संघाचा तो सहा वेळा भाग होता. बॅडमिंटन जगतातील आजवरच्या महान खेळाडूंपैकी एक म्हणून ॲक्सल्सेन नेहमी स्मरणात राहील, अशा शब्दांत भारताचा बॅडमिंटनपटू लक्ष्य सेन याने आपली प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. "बॅडमिंटनला तुझ्यासारखा खेळाडू लाभला हे या खेळाचे भाग्य आहे. तू फक्त एक महान विजेता म्हणूनच नाही, तर एक उत्तम व्यक्ती म्हणूनही ओळखला जाशील. सामने आणि पदकांपेक्षा तुझे व्यक्तिमत्त्व अधिक मोठे आहे," असेही लक्ष्यने म्हटले आहे.

# आर वैशाली ची ऐतिहासिक झेप ; महिला कॅन्डिडेट्स स्पर्धेत शानदार विजय १५ वर्षांनंतर वर्ल्ड चॅम्पियनशिपसाठी पात्र

■ मुंबई/वृत्तसंस्था

भारताचे बुद्धिबळपटू सातत्याने उत्कृष्ट कामगिरी करत भारताचा तिरंगा मानाने उंचावताना दिसत आहेत. पुरूष बुद्धिबळपटूंबरोबरच महिला बुद्धिबळपटूदेखील जागतिक स्तरावर आपल्या नावाचा डंका वाजवत आहेत. आर वैशाली हिने सध्या सुरू असलेल्या महिला कॅन्डिडेट्स स्पर्धेत ऐतिहासिक विजय मिळवला आहे. यासह तिने मोठा विक्रम आपल्या नावे केला आहे.

महिला कॅन्डिडेट्स स्पर्धेचा क्लायमॅक्स इतका नाट्यमय असेल असं कोणालाही वाटलं नव्हतं. पण आर. वैशालीने आपल्या अनुभवाचा आणि संयमाचा कस लावत अशक्य वाटणारा विजय खेचून आणला. जागतिक चॅम्पियनशिपच्या लढतीसाठी गेल्या १५ वर्षांत ती पात्र ठरणारी पहिलीच भारतीय महिला ठरली आहे. तिच्या या यशाने भारतीय बुद्धिबळाच्या सुवर्णयुगाची पुन्हा सुरुवात झाली आहे. शेवटच्या क्षणापर्यंत रंगलेल्या या संघर्षात वैशालीचा आत्मविश्वासच तिचा सर्वात मोठा हुकुमी एक्का ठरला. या निकालामुळे बुद्धिबळाच्या इतिहासात फक्त दुसऱ्यांदाच एखादी भारतीय महिला वर्ल्ड चॅम्पियनशिपच्या किताबासाठी लढणार आहे. वैशाली ही या मानाच्या स्पर्धेत पोहोचणारी दुसरी भारतीय महिला ठरली आहे. तिच्याआधी कोनेरू




हम्पीने २०११ मध्ये अल्बेनियातील तिराना येथे हौ यिफानविरुद्ध महिलांच्या किताबासाठी आव्हान दिलं होतं. तर कोनेरू हम्पीनंतर आता आर वैशाली गेल्या १५ वर्षांत ही कामगिरी करणारी पहिली खेळाडू ठरली. प्रज्ञानानंद आणि वैशाली ही बहिणभावांची जोडी कँडिडेट्स स्पर्धेत दुसऱ्यांदाच सहभागी झाले होते. १४ फेऱ्यांच्या या स्पर्धेत पाच फेऱ्यांनंतर वैशाली दिव्या देशमुख आणि तान झोंगयी यांच्यासोबत शेवटच्या स्थानावर होती. पण त्यानंतर तिच्या खेळात झालेला बदल इतका जबरदस्त होता की जिथे दिव्या आणि तान शेवटच्या दोन स्थानांवर राहिल्या, तिथे वैशाली थेट अव्वल स्थानावर पोहोचली. वैशालीचं हे पुनरागमन फार आश्चर्यकारक नाही. दोन वर्षांपूर्वी टोरांटो येथे झालेल्या कँडिडेट्स स्पर्धेतही ती पहिल्या नऊ फेऱ्यांनंतर सलग चार पराभवांमुळे शेवटच्या स्थानावर होती.

# मुंबईत घराच्या छतावर नोंदणी पद्धतीने लग्न का केलं? अभिनेत्री म्हणाली, "धार्मिक विधींमध्ये गुंतून राहायचं नव्हतं..."

कृतिका कामरा आणि गौरव कपूर यांनी घराच्या छतावर लग्न केलं. अगदी साधपणाने, मोजक्यात पाहुण्यांच्या उपस्थितीत त्यांनी नोंदणी पद्धतीने लग्नगाठ बांधली. सोशल मीडियावर या लग्नातील साधेपणाची खूप चर्चा झाली. दोघांनी लग्नातील बडेजावपणाला फाटा देत जवळचे नातेवाईक आणि मित्रमंडळींच्या उपस्थितीत लग्न केलं. कृतिकाने 'डेस्टिनेशन वेडिंग' न करण्याचा निर्णय का घेतला, याबद्दल सांगितलंय.

कृतिका म्हणाली, "खरं तर आमच्यासाठी लग्न सोहळा महत्त्वाचा नव्हता, तर लग्नाचं नातं महत्त्वाचं होतं. त्यामुळे लग्न करायचं ठरवल्यावर सोहळा कसा करायचा हा आमच्यासाठी फार मोठा प्रश्न नव्हता. ३-४ दिवस चालणारे डेस्टिनेशन वेडिंग आम्हाला नकोच आहे, हे आमचं आधीच ठरलं होतं. आम्हाला वेळेच्या बंधनात अडकायचं नव्हतं आणि सकाळ-संध्याकाळ धार्मिक विधींमध्ये गुंतून राहायचं नव्हतं."

**गौरव-कृतिकाच्या लग्नात वेळेचे कोणतेही बंधन नव्हते**



कृतिकाने सांगितलं की, त्यांच्या लग्नात कोणत्याही गोष्टीबद्दल सक्ती नव्हती. त्यांनी तसं नियोजनच केलं नव्हत. "मी माझ्या लग्नात खूप आनंदी होते, कारण आम्ही यजमान म्हणून धावपळ करत नव्हतो. सूर्य मावळतोय म्हणून घाई करा, आता ही एंट्री झालीच पाहिजे किंवा इतक्या वाजता डान्स परफॉर्मन्स झालाच पाहिजे, असं सांगणारं तिथे कोणीही नव्हतं. आम्ही कोणासाठीही शो ऑफ करत नव्हतो. आमचे मित्र आणि कुटुंबीयांबरोबर हा सोहळा खूप आनंदाने पार पाडला. आम्हाला आमच्या घरातील वृद्ध व्यक्ती आणि लहान मुले या सर्वांना सोबत घेऊन हा आनंद साजरा करायचा होता. म्हणूनच आम्ही लग्न मुंबईतच करायचं ठरवलं," असं कृतिका कामरा म्हणाली.


कृतिका आणि गौरवने मुंबईतच लग्न करण्याचा निर्णय घेतला कारण या शहराशी त्यांचं भावनिक नातं आहे. वांद्रे येथील त्यांच्या राहत्या घरीच हा विवाह सोहळा पार पडला. कृतिका म्हणाली, "दुसरं शहर जास्त सुंदर दिसतं म्हणून तिथे जाऊन लग्न करण्यात आम्हाला काही अर्थ वाटला नाही." तसेच गौरवने लग्नासाठी अशा वेळी मागणी घातली जेव्हा ती त्याला 'नाही' म्हणूच शकणार नव्हती. ती म्हणाली, "त्याने योग्य वेळ येईपर्यंत वाट पाहिली. आमचं नातं खूप परिपक्व आहे आणि आम्हा दोघांनाही दिखावा करायला आवडत नाहीत."

लग्नानंतरचा पहिला महिना कसा होता, याबद्दल कृतिका म्हणाली, "आधी आम्ही आपापल्या घरी राहायचो, आता एकत्र राहतो. सुरुवातीचे दोन दिवस 'आता मला माझ्या घरी परत जायचं नाहीये' असं वाटलं, पण मी लवकरच रुळले. हा बदल खूप सहज होता. आधी आम्ही आमचे आयुष्य स्वतंत्रपणे जगत होतो, आता मी माझ्या बेस्ट फ्रेंडबरोबर आयुष्य जगतेय." गौरवनेदेखील एका मुलाखतीत कृतिकाबद्दलच्या आपल्या भावना व्यक्त केल्या. त्याने त्यांच्या नात्याची तुलना 'थंडीच्या रात्री उबदार शेकोटीशी' केली. त्यांच्या पहिल्या भेटीबद्दल गौरव म्हणाला, "आम्ही पहिल्यांदा बोललो ते मला स्पष्ट आठवतं. आम्ही तासभर बोललो आणि मला ते खूप सोपं आणि सहज वाटलं. तिची शांतता पाहून मी थक्क झालो. मी खूप पटकन प्रतिक्रिया देणारा माणूस आहे, तर ती भविष्याचा विचार करून शांतपणे वागणारी आहे. अशा प्रकारे आम्ही एकमेकांना पूरक आहोत."

कमिटमेंटबद्दल बोलताना तो म्हणाला, "तिला नेहमी खंबीर साथ देणं हीच माझ्यासाठी कमिटमेंट आहे. तिला आयुष्यात प्रगती करताना पाहणं हे माझं ध्येय आहे. ती एक विमान आहे आणि मी तिला पुढे ढकलणारा वारा आहे, जो तिला अधिक उंच भरारी घेण्यास मदत करेल."

## दलित पँथरच्या नामदेव ढसाळांचे जीवनपट मोठ्या पडद्यावर

दलित पँथरचे प्रणेते आणि विद्रोही कवी नामदेव ढसाळ यांच्या जीवनावर आधारित बहुप्रतीक्षित 'ढसाळ' या चरित्रपटाची अखेर अधिकृत घोषणा करण्यात आली असून, त्याचे भव्य पोस्टर प्रदर्शित करण्यात आले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीचे औचित्य साधत मुंबईत हा सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला.



या चित्रपटात अभिनेता ललित प्रभाकर नामदेव ढसाळ यांच्या भूमिकेत झळकणार असून, नुकत्याच समोर आलेल्या पोस्टरमधून त्यांचा दमदार आणि प्रभावी लूक प्रेक्षकांच्या चर्चेचा विषय ठरला आहे. ललितचा हा बंडखोर आणि तडफदार अंदाज चित्रपटासाठी मोठं आकर्षण मानलं जात आहे. संजय पांडेय आणि दि बायोस्कोप फिल्म्स प्रस्तुत, वरुणा मदनलाल राणा निर्मित 'ढसाळ' हा चित्रपट येत्या १ ऑक्टोबर २०२६ रोजी मराठी आणि हिंदी भाषेत प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटाचे लेखन व दिग्दर्शन वरुणा राणा यांनी केले असून, संवाद प्रताप गंगावणे यांनी लिहिले आहेत. चित्रपटातून नामदेव ढसाळ यांच्या संघर्षमय जीवनप्रवासाचे वास्तववादी चित्रण पाहायला मिळणार आहे. त्यांच्या कवितेतील विद्रोह, अन्यायाविरुद्ध उभारलेला लढा आणि समाजाला विचार करायला भाग पाडणारे विचार पडद्यावर प्रभावीपणे मांडले जाणार आहेत. या चित्रपटाला दाक्षिणात्य दिग्गज संगीतकार इलैयाराजा यांचे संगीत लाभले आहे. तसेच हिंदीतील प्रसिद्ध गीतकार इर्शाद कामील आणि मराठीतील गुरु ठाकूर यांनी गाणी लिहिली आहेत. चित्रपटातील ललित प्रभाकर यांचा लूक साकारण्यासाठी प्रख्यात रंगभूषाकार श्रीकांत देसाई यांनी विशेष मेहनत घेतली आहे.

## गरजेच्या वेळी कामाचे पैसे मिळालेच नाहीत; जवळजवळ १० लाख रुपये.. "बायकोला कॅन्सर.."

विजय पटवर्धन हे नुकतेच 'पारू' या मालिकेत महत्त्वाच्या भूमिकेत दिसले होते. या मालिकेत त्यांनी श्रीकांत किर्लोस्कर ही भूमिका साकारली होती. अहिल्यादेवी किर्लोस्कर आणि श्रीकांत किर्लोस्कर यांची भूमिका चांगलीच गाजली. या मालिकेतील सर्वच पात्रांना प्रेक्षकांचे मोठ्या प्रमाणात प्रेम मिळाले. मात्र, पारू मालिका अचानक बंद झाली, तेव्हा मात्र प्रेक्षक नाराज झाल्याचे पाहायला मिळाले.

विजय पटवर्धन, मुग्धा कर्णिक, शरयू सोनावणे, श्रुतकिर्ती सावंत यांनी पोस्ट शेअर करत मालिका बंद झाल्यानंतर प्रेक्षकांचे आभार मानले होते. तसेच, विजय पटवर्धन आणि मुग्धा कर्णिक यांनी नवीन नाटकातून प्रेक्षकांच्या भेटीला येणार असल्याची घोषणा केली होती.. कॅरी ऑन स्पायगिरी या नाटकात ते एकत्र दिसत आहेत.

आता या सगळ्यात विजय पटवर्धन हे त्यांच्या एका वक्तव्यामुळे चर्चेत आले आहेत. त्यांनी नुकतीच राजश्री मराठीला मुलाखत दिली. या मुलाखतीत त्यांना विचारले की पैसे बुडवण्याचा कधी अनुभव आला का? यावर विजय पटवर्धन म्हणाले, "हो, हे माझ्याबाबत झालं आहे. चेक मिळाला आणि तो बाऊन्स झाला असं झालं आहे. साधारणपणे लॉकडाऊनच्या अलीकडे पलीकडे हे झालं आहे आणि आताही एक मालिका करत होतो, तेव्हाही हे झालं आहे. पण, ते होईल. मॅनिफॅस्टेशनवर माझा विश्वास आहे, ते पैसे मिळतील."





आतापर्यंत पैसे मिळालेच नाहीत, ती एकूण किती किंमत असेल? यावर विजय पटवर्धन म्हणाले, "आतापर्यंत पैसे मिळालेच नाहीत, असे जवळजवळ दहा लाख रुपये आहेत, ते पैसे मला मिळालेच नाही."

ती रक्कम खूप महत्त्वाची होती, त्याचा दोष द्यावासा वाटतो का? यावर ते म्हणाले, "हो, दोष द्यावासा वाटतो, कारण अडीअडचणीला ती रक्कम मिळाली नाही. दुर्देवाने माझ्या बायकोला कॅन्सर असल्याचे निदान झाले. तिच्या वैद्यकीय कारणांमुळे मेडिकल इन्शुरन्ससुद्धा नव्हता, खूप मोठा खर्च झाला होता. त्यावेळेला जर ती रक्कम मिळाली असती, जी आतापर्यंत अजून मिळाली नाही तर मदत झाली असती. मी त्या माणसाला फोनही केला की माझी अशी अडचण आहे."

## आठ वर्षांच्या रिलेशनशिपनंतर शिवानी सुर्वेनं केलं अजिंक्यसोबत लग्न

स्वकलाकार विविध भूमिकांमधून, चित्रपटांमधून प्रेक्षकांच्या भेटीला येतात. या कलाकारांचा मोठा चाहतावर्ग असतो. कलाकारांच्या जीवनशैलीबद्दल, त्यांच्या खासगी आयुष्याबद्दल त्यांना जाणून घ्यायचे असते. कलाकारही त्यांच्या सोशल मीडियाच्या माध्यमातून, विविध मुलाखतींमधून विविध गोष्टी शेअर करत असतात.

अभिनेत्री शिवानी सुर्वेला 'देवयानी' मालिकेतून मोठ्या प्रमाणात लोकप्रियता मिळाली. त्यानंतर ती 'बिग बॉस'मध्येदेखील सहभागी झाली होती. काही चित्रपटांमध्येदेखील शिवानी सुर्वेने काम केले आहे. स्टार प्रवाह वाहिनीवरील 'थोडं तुझं आणि थोडं माझं' या मालिकेत ती प्रमुख भूमिकेत दिसली होती.

आता अभिनेत्रीने एका मुलाखतीत तिच्या पतीबद्दल केलेले वक्तव्य चर्चेत आहे. अभिनेत्री शिवानी सुर्वेने 'राजश्री मराठी'ला मुलाखत दिली. या मुलाखतीत तिने तिच्या पतीबद्दल म्हणजेच अभिनेता अजिंक्य ननावरेबद्दल वक्तव्य केलं. ती म्हणाली, "लग्नाचा योग्य निर्णय होता, तो योग्य वेळीसुद्धा घेतला. आम्ही आठ वर्षे एकमेकांना डेट केलं. त्यानंतर लग्नाचा निर्णय घेतला."





पती अजिंक्यबद्दल शिवानी पुढे म्हणाली, "अजिंक्य असा माणूस आहे की तो खूप शांत आहे. मला जेव्हा त्याची गरज असते, तेव्हा तो तिथे असतो. मला जेव्हा त्याची गरज असते तेव्हा मी त्याला सांगते की अमुक अशा गोष्टींमध्ये मला तुझी गरज आहे आणि हे तू मला करून दे. तेव्हा तो येतो. त्याआधी तो काहीही करायला जात नाही. त्याचं म्हणणं असं असतं की तू कर, तू एवढी वर्ष करत आली आहेस. तुला वाटलं की तुला माझी कशात मदत होऊ शकते, तेव्हा मी त्या गोष्टी करेन." पुढे ती हसत म्हणाली की, मी कायम म्हणते की मी ग्रीन फ्लॅग मुलगा मागितला होता, एवढा ग्रीन फ्लॅग दिला की मी त्याच्या समोर रेड फ्लॅग वाटायला लागले. जेव्हा नवरा बायको एकाच क्षेत्रात काम करत असतात त्यावेळी असं होऊ शकतं की एकाला जास्त प्रोजेक्ट येतात आणि एकाला काम तितक्या प्रमाणात मिळत नाही, त्यावेळी तुम्ही ते त्याचा कसा समतोल साधता? त्यावर शिवानी म्हणाली, "यासाठी प्लॅनिंगची गरज लागते. त्या गोष्टी मी प्लॅन करते. मी स्मार्टपणे गोष्टी हँडल करते. एक व्यक्ती एका गोष्टीत उत्तम असेल तर दुसऱ्या व्यक्ती दुसऱ्या गोष्टीत उत्तम आहे. त्यामुळे अजिंक्यचा शांतपणा खूप मदत करतो. त्याच्यामुळे गोष्टी खूप सोप्या होतात." दरम्यान, अजिंक्यच्या कामाबद्दल बोलायचे तर तो सध्या स्टार प्रवाह वाहिनीवरील 'तुझ्या सोबतीने' या मालिकेत प्रमुख भूमिकेत काम करत आहे. तर शिवानी आता आगामी काळात कोणत्या प्रोजेक्टमधून प्रेक्षकांच्या भेटीला येणार हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त राज्यस्तरीय निबंध स्पर्धा

**बुलढाणा**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागामार्फत राज्यस्तरीय निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी महिलांसाठी केलेले कार्य या विषयावर आधारित असून दोन गटांत आयोजित करण्यात आली आहे. गट क्रमांक एकमध्ये आयटीआय, डिप्लोमा, बायफोकल, एमसीव्हीसी प्रशिक्षणार्थी व उत्तीर्ण विद्यार्थी तर दुसऱ्या गटात खुला गट (पुरुष व महिला) आहे. निबंधासाठी शब्दमर्यादा गट क्र. १ साठी ५०० ते ८०० शब्द, तर गट क्र. २ साठी ८०० ते १२०० शब्द अशी निश्चित करण्यात आली आहे. स्पर्धेत सहभागी होणाऱ्या स्पर्धकांनी आपला निबंध जाहीरातीत नमूद केलेल्या गुगल फॉर्म ( कोड / लिंक) द्वारेच पीडीएफ स्वरूपात सादर करावा. निबंध सादर करण्याचा कालावधी १४ एप्रिल २०२६ ते २० एप्रिल २०२६ असा राहणार आहे. प्रत्येक गटासाठी आकर्षक पारितोषिके जाहीर करण्यात आली आहेत. प्रथम क्रमांकासाठी ३१ हजार रुपये, द्वितीय क्रमांकासाठी २१ हजार रुपये आणि तृतीय क्रमांकासाठी ११ हजार रुपये तसेच स्मृतिचिन्ह व सन्मानपत्र देण्यात येणार आहे. निबंध मराठी भाषेत लिहिणे अनिवार्य असून तो पूर्णतः मौलिक असावा. कॉपी आढळल्यास संबंधित स्पर्धक अपात्र ठरणार आहे. प्रत्येक स्पर्धकाने एकच निबंध सादर करावा. निबंध हस्तलिखित किंवा टंकलिखित स्वरूपात स्वीकारला जाणार असून अंतिम सादरीकरण पीडीएफ स्वरूपात करणे आवश्यक आहे. स्पर्धकांनी निबंध अपलोड करताना आपले पूर्ण नाव, गट क्रमांक, संपर्क क्रमांक, शाळा/महाविद्यालयाचे नाव व संपूर्ण पत्ता यांची माहिती भरणे बंधनकारक आहे. या स्पर्धेत प्रशिक्षणार्थी व नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवावा, असे आवाहन खामगाव शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थाचे प्राचार्य, गटनिदेशक व कार्यालयीन अधीक्षक यांनी केले आहे.


आपल्या पाल्याच्या शिक्षणासाठी आजच बचत सुरु करा व त्याचे भविष्य सुरक्षित करा

बचत करा रु. ५०० प्रती माह पासून..



| अ.क्र. | गुंतवणूक कालावधी महिने | ५०० | १००० | १५०० | २००० | ३००० | ५००० |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | पाल्याच्या वयाच्या १८ वर्षांनंतर मिळणारी रक्कम | | | | | |
| १ | १५६ | १०३४१८ | २०६८३६ | ३१०२५४ | ४१३६७२ | ६२०५०७ | १०३४१७९ |
| २ | १४४ | ९५५४४ | १९१०८८ | २८६६३३ | ३८२१७७ | ५७३२६५ | ९५५४४२ |
| ३ | १३२ | ८८२६९ | १७६५३८ | २६४८०६ | ३५३०७५ | ५२९६१३ | ८८२६८८ |
| ४ | १२० | ८१५४४ | १६३०८७ | २४४६३१ | ३२६१७५ | ४८९२६२ | ८१५४३६ |
| ५ | १०८ | ७५३३६ | १५०६७१ | २२६००७ | ३०१३४२ | ४५२०१३ | ७५३३५५ |
| ६ | ९६ | ६५५९६ | १३९१९३ | २०८७८९ | २७८३८६ | ४१७५७९ | ६९५९६५ |

ठेवींवरील आकर्षक व्याजदर

| अ.क्र. | मुदती ठेवीचे विवरण | | लागू व्याजदर | पतसंस्था व इतर संस्था |
|---|---|---|---|---|
| १ | १५ दिवस ते ९० दिवस | | ६.००% | ६.००% |
| २ | ९१ दिवस ते १८० दिवस (वैयक्तीक ठेवी करिता) | | ६.५०% | ५.००% |
| ३ | १८१ दिवस ते १३ महिने | | ६.००% | ६.००% |
| ४ | १४ महिन्याच्या वर २४ महिन्यापर्यंत (वैयक्तीक ठेवी करिता) | | ७.००% | ६.००% |
| ५ | आवर्त ठेव योजना २४ महिन्याकरिता रू. १५ लाखाचे वर (वैयक्तीक ठेवी करिता) | | ७.००% | ६.००% |
| ६ | मासिक ठेव | | ७.००% | - |
| ७ | बचत ठेव | अ) रू. ३ लाखांपर्यंत | ३.००% | - |
| | | ब) रू. ३ लाखांचे वर | ४.५०% | - |

ज्येष्ठ नागरिक, सैनिक, सैनिकांच्या विधवा पत्नी, दिव्यांग यांना ठेवींच्या व्याजदरावर १/२ टक्का जास्त व्याजदर लागू राहील.

5 लाख पर्यंतच्या ठेवींना DICGC चे संरक्षण कवच प्राप्त आहे



पुन्हा एकदा...
सुकन्या
लक्षाधीश ठेव योजना

गुंतवणूकीचा कालावधी मुलीच्या वयाच्या १० वर्षापर्यंत

ग्राहकांच्या आग्रहाला मान देऊन बँक पुन्हा सुरू करीत आहे
सुकन्या लक्षाधीश ठेव योजना
जन्मापासून ते वय वर्ष १० पर्यंतच्या मुलींच्या भावी आयुष्यासाठी एकदाच या योजनेत गुंतवणूक करा व मुलीच्या २१ व्या वर्षी लक्षाधीश व्हा.

| वय | गुंतवणूक रक्कम | मिळणारी रक्कम |
|---|---|---|
| जन्माच्या वेळी | १७००० | १०३६०९ |
| १ वर्ष | १८००० | १००६५७ |
| २ वर्ष | १९५०० | १०००५२ |
| ३ वर्ष | २१५०० | १०१२१७ |
| ४ वर्ष | २३५०० | १०१५०९ |
| ५ वर्ष | २५५०० | १०१०६४ |
| ६ वर्ष | २७५०० | १००००३ |
| ७ वर्ष | ३०००० | १०००९७ |
| ८ वर्ष | ३३००० | १०१०२७ |
| ९ वर्ष | ३६००० | १०११२२ |
| १० वर्ष | ३९००० | १००५१५ |

आजच जवळच्या शाखेशी संपर्क करा

दि चिखली अर्बन को-ऑप. बँक लि. चिखली

मुख्यालय : डॉ. शामाप्रसाद मुखर्जी मार्ग, छत्रपती शिवाजी महाराज चौक, चिखली, जि. बुलडाणा

फोन : ०७२६४-२४२०३९, २४२९७९, २४२०३८ टोल फ्रि नंबर : १८००-३१३-२३२४


# वनपट्टा धारक शेतकऱ्यांसाठी फार्मर आयडी नोंदणी मोहीम सुरू

**जनसंचलन/बुलढाणा**

राज्यातील वनपट्टा धारक शेतकऱ्यांसाठी नोंदणीची विशेष मोहीम सुरू करण्यात आली असून, ही नोंदणी नागरी सुविधा केंद्र () मार्फत राज्यभर राबविण्यात येत आहे. या नोंदणीसाठी शेतकऱ्यांकडून कोणतेही शुल्क आकारले जाणार नसल्याचे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे. भारत सरकारच्या मार्गदर्शक सूचनांनुसार राज्यात डिजिटल कृषी पायाभूत सुविधा उभारण्यासाठी ॲग्रीस्टॅक () योजनेची अंमलबजावणी सुरू आहे. त्यानुसार, कृषि विभागाच्या विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी नोंदणी अनिवार्य करण्यात आली आहे. वनहक्क अधिनियम २००६ अंतर्गत अनुसूचित जमाती व पारंपरिक वननिवासी समुदायांना त्यांच्या वनजमिनीवरील हक्क प्रदान करण्यात आले आहेत याच पार्श्वभूमीवर वनपट्टा धारक शेतकऱ्यांची नोंदणी सुलभ करण्यासाठी विशेष मोहीम हाती घेण्यात आली आहे.

# बुलढाण्याच्या अथर्व ताठेची राष्ट्रीय तिरंदाजी स्पर्धेत चमकदार कामगिरी

**जनसंचलन/बुलढाणा**

आंध्र प्रदेशातील गुंटूर येथे २६ मार्च ते ७ एप्रिल २०२६ दरम्यान पार पडलेल्या १५ वी चेचुकरी लेनिन ढोला स्मृती इंडियन राउंड (-१५), ७ वी इंडियन राउंड (-१०) व २ री इंडियन राउंड (-१३) राष्ट्रीय तिरंदाजी स्पर्धेत बुलढाणा जिल्ह्याच्या अथर्व देवानंद ताठे याने उत्कृष्ट कामगिरी करत जिल्ह्याचा मान उंचावला आहे. अथर्व ताठे याने महाराष्ट्र राज्याचे प्रतिनिधित्व करत -१५ गटात देशभरातून चौथा क्रमांक पटकावला. तसेच कंपाऊंड बायर्डिंग प्रकारात महाराष्ट्र संघाला रौप्य पदक मिळवून देत राज्याच्या यशात मोलाचा वाटा उचलला. यापूर्वी सोलापूर येथे झालेल्या राज्यस्तरीय स्पर्धेत तृतीय क्रमांक मिळवत अथर्वने राष्ट्रीय स्पर्धेसाठी पात्रता मिळवली होती. सातत्यपूर्ण मेहनत, चिकाटी आणि जिद्दीच्या जोरावर त्याने राष्ट्रीय स्तरावरही आपली छाप पाडली आहे.

अथर्वच्या या यशामागे आंतरराष्ट्रीय तिरंदाजी प्रशिक्षक चंद्रकांत इलग (शिवबा आर्चरी अकॅडमी, बुलढाणा) यांचे मार्गदर्शन महत्त्वपूर्ण ठरले आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली अथर्वने यापूर्वीही विविध स्पर्धांमध्ये उल्लेखनीय कामगिरी केली आहे. अथर्वच्या या यशामुळे बुलढाणा जिल्ह्यासह महाराष्ट्र राज्याचा क्रीडा क्षेत्रात अभिमान उंचावला असून सर्व स्तरांतून त्याच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

# महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचा जिल्हा दौरा



**जनसंचलन/बुलढाणा**

राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे हे सोमवार दि. २० एप्रिल २०२६ रोजी बुलढाणा जिल्हा दौऱ्यावर येत आहे. त्यांच्या दौरा कार्यक्रमानुसार सोमवार दि. २० एप्रिल रोजी सकाळी १० वाजता नागपूर येथून शेगाव हेलीपॅड येथे आगमन व संत गजानन महाराज संस्थानकडे प्रयाण. सकाळी १०.१५ वाजता श्री संत गजानन महाराज संस्थान येथे दर्शनासाठी राखीव. सकाळी ११ वाजता शेगाव हेलीपॅड येथून चिखलीकडे रवाना. सकाळी ११.३० वाजता चिखली येथील शेरखजी बोंद्रे यांच्या शेतातील हेलीपॅडवर आगमन व कार्यक्रम स्थळी प्रस्थान. दुपारी ११.४५ वाजता देव्हडे फार्म ॲन्ड ॲग्रो टुरिझमचे उद्घाटन कार्यक्रमास उपस्थिती. दुपारी १ वाजता चिखली हेलीपॅड येथे आगमन व नागपूरकडे प्रयाण करतील.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# अक्षयतृतीयेला बालविवाह रोखण्यासाठी प्रशासन सतर्क; नियम मोडल्यास कडक कारवाईचा इशारा

जनसंचलन/बुलढाणा

अक्षयतृतीयेचा मुहूर्त अत्यंत शुभ मानला जात असला तरी या दिवशी छुप्या मार्गाने बालविवाह होण्याची शक्यता लक्षात घेऊन प्रशासनाने सतर्कता वाढविली आहे. ग्रामीण व शहरी भागात १९ एप्रिल रोजी होणाऱ्या विवाह सोहळ्यांमध्ये बालविवाह होणार नाही, याची विशेष दक्षता घेण्याचे आवाहन जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी अमोल डिघुळे यांनी केले आहे. भारतीय कायद्यानुसार मुलाचे किमान वय २१ वर्षे आणि मुलीचे १८ वर्षे पूर्ण असणे बंधनकारक आहे. यापेक्षा कमी वयात विवाह केल्यास तो बालविवाह प्रतिबंधक अधिनियम २००६ अंतर्गत बेकायदेशीर ठरतो. या कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी ग्रामीण भागात ग्रामसेवक तर शहरी भागात बालविकास प्रकल्प अधिकारी यांची बालविवाह प्रतिबंधक अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आलेली



आहे. गावपातळीवर सरपंच, पोलीस पाटील आणि अंगणवाडी सेविका यांनी विवाहपूर्वी वधू-वरांचे वय तपासून खात्री करावी, असेही प्रशासनाने स्पष्ट केले आहे. बालविवाह लावणे हा दखलपात्र गुन्हा असून, केवळ पालकच नव्हे तर विवाह सोहळ्यात सहभागी होणारे वऱ्हाडी, भटजी, वाजंत्री, मंगल कार्यालय चालक तसेच बिछायत केंद्र चालक यांच्यावरही गुन्हे दाखल होऊ शकतात. दोषींना २ वर्षांपर्यंत सश्रम कारावास आणि ५ लाख रुपयांपर्यंत दंडाची शिक्षा होऊ शकते. गावात किंवा परिसरात बालविवाह होत असल्याची माहिती मिळाल्यास तात्काळ चाईल्ड हेल्पलाईन १०९८ किंवा पोलीस विभागाच्या ११२ या टोल फ्री क्रमांकावर कळवावे. माहिती देणाऱ्याची ओळख गोपनीय ठेवली जाईल, असे प्रशासनाने सांगितले आहे. जिल्हा बालविवाहमुक्त करण्यासाठी प्रशासन कटिबद्ध असून, संशयास्पद विवाहांची माहिती तत्काळ देऊन नागरिकांनी सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# प्रशिक्षणार्थ्यांसाठी भोजन पुरवठा करण्यासाठी बंद निविदा आमंत्रित

जनसंचलन/बुलढाणा

सेंट ग्रामीण स्वयंरोजगार प्रशिक्षण संस्था, जांभरुण रोड, बुलढाणा येथे प्रशिक्षण घेणाऱ्या प्रशिक्षणार्थ्यांसाठी भोजन पुरवठा करण्याबाबत बंद निविदा मागविण्यात येत आहेत. इच्छुक व पात्र पुरवठादारांनी दि. २० एप्रिल २०२६ पर्यंत आपली बंद निविदा संस्थेच्या कार्यालयात सादर करावी. इच्छुकांनी प्रथम संस्थेच्या कार्यालयात प्रत्यक्ष भेट देऊन सेवेसंदर्भातील सविस्तर अटी व शर्तींचे पत्र प्राप्त करून घ्यावे. त्यानंतर सर्व आवश्यक कागदपत्रांसह नियोजित मुदतीपूर्वी निविदा सादर करणे बंधनकारक राहील. सदर निविदा सेंट ग्रामीण स्वयंरोजगार प्रशिक्षण संस्था, बुलढाणा शाखा येथेच स्वीकारण्यात येणार असून मुदतीनंतर प्राप्त झालेल्या निविदांचा विचार केला जाणार नाही. अधिक माहितीसाठी अभंग बिल्डिंग, जांभरुण रोड, विठ्ठल नगर, जनशिक्षण संस्थेच्या बाजूला, बुलढाणा येथे किंवा मो. क्रमांक ९०९६१३४५०० / ९५०३६७४०१३ / ७४९९४५८२३९ / ८८७९६०७५७६ वर संपर्क साधावा.

# उष्माघातापासून बचावासाठी आरोग्य विभागाचे सतर्कतेचे आवाहन



जनसंचलन/बुलढाणा

उन्हाच्या तीव्रतेत वाढ होत असताना उष्माघाताच्या घटना टाळण्यासाठी नागरिकांनी सतर्क राहण्याचे आवाहन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अमोल गिते यांनी केले आहे. उष्माघाताचे गंभीर परिणाम होऊ शकतात, त्यामुळे वेळेवर योग्य प्रथमोपचार आणि खबरदारी घेणे अत्यावश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. उष्माघाताचा त्रास झाल्यास संबंधित व्यक्तीला तातडीने सावलीत किंवा थंड ठिकाणी हलवावे. घट्ट कपडे सैल करून शरीरावर थंड पाण्याच्या ओल्या पट्ट्या ठेवाव्यात. रुग्णाला हवा मिळण्यासाठी पंख्याचा वापर करावा तसेच पायाखाली उशी ठेवून आरामदायी स्थितीत ठेवावे. व्यक्ती शुद्धीत असल्यास थंड पाणी हळूहळू द्यावे, मात्र बेशुद्ध असल्यास काहीही खायला किंवा पिण्यास देऊ नये. उलटी होत असल्यास व्यक्तीला एका बाजूला झोपवणे आवश्यक आहे. उन्हाच्या लाटेदरम्यान हलके व पचायला सोपे अन्न, फळे आणि सॅलडचा आहार घ्यावा. पुरेसे पाणी पिणे अत्यंत गरजेचे आहे. सूती, सैल आणि फिकट रंगाचे कपडे परिधान करावेत. बाहेर पडताना टोपी, छत्री, गॉगल यांचा वापर करावा आणि प्रवासात पाण्याची बाटली सोबत ठेवावी. शक्यतो थंड पाण्याने आंघोळ करावी व मैदानी कामांदरम्यान वेळोवेळी विश्रांती घ्यावी. उष्माघातापासून बचावासाठी घराबाहेर पडण्यापूर्वी पाणी पिणे, डोके झाकणे आणि लिंबूपाणी, ओआरएस, आंबा पन्हे यांसारखी द्रवपदार्थ घेणे फायदेशीर ठरते. रिकाम्या पोटी बाहेर पडणे, उन्हात दीर्घकाळ राहणे तसेच तिखट, मसालेदार व जड अन्न सेवन करणे टाळावे. जर एखाद्या व्यक्तीचे शरीराचे तापमान जास्त वाढलेले असेल, ती बेशुद्ध किंवा गोंधळलेली असेल किंवा श्वास घेण्यास त्रास होत असेल, तर तात्काळ १०८ किंवा १०२ या आपत्कालीन क्रमांकावर संपर्क साधून वैद्यकीय मदत घ्यावी. उन्हाच्या लाटेकडे दुर्लक्ष न करता आवश्यक ती खबरदारी घ्यावी आणि स्वतःसह कुटुंबाचे संरक्षण करावे, असे आवाहन आरोग्य विभागाने केले आहे.

# संत सावता माळीफमहिला बचत गटाने साधला आर्थिक सक्षमीकरणाचा मार्ग

बुलढाणा

महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम) अंतर्गत बुलढाणा जिल्ह्यातील देऊळगाव मही केंद्राच्या माध्यमातून पांगरी माळी या गावात महिलांच्या सक्षमीकरणाची एक प्रेरणादायी कथा घडली आहे. देऊळगाव महीपासून सुमारे ३० मिनिटांच्या अंतरावर असलेल्या या गावाची लोकसंख्या सुमारे २५०० असून येथे १९ बचत गट कार्यरत आहेत. गावात शाळा, अंगणवाडी, पाणी फिल्टर यंत्र, जनावरांसाठी दवाखाना अशा मूलभूत सुविधा उपलब्ध आहेत. सुमारे २०० महिला बचत गटांशी जोडल्या गेल्या आहेत. या गावातील ङ्गसंत सावता माळी महिला बचत गटफ हा एक आदर्श गट ठरला आहे. या गटाची स्थापना २७ डिसेंबर २०१५ रोजी झाली असून गटात ११ महिला सदस्य आहेत. सुरुवातीला गटाला बँकेकडून १ लाख १० हजार रुपयांचे कर्ज मिळाले. त्यानंतर वेळोवेळी कर्जसुविधा मिळत गेली आणि गटाने आर्थिक प्रगतीचा मार्ग धरला. गटातील महिलांनी भाजीपाला उत्पादनाचा व्यवसाय सुरू करण्याचा निर्णय घेतला. या उपक्रमासाठी गटातील अनिता सोपान वाघ यांची निवड करण्यात आली. पूर्वी त्या स्वतःच्या शेतात काम करत होत्या, परंतु भांडवलाच्या अभावामुळे मोठ्या प्रमाणात शेती करणे शक्य होत नव्हते. देऊळगाव महीच्या मार्गदर्शनाखाली करार पद्धतीने शेती करण्याचा निर्णय घेण्यात आला. या करारानुसार शेतकऱ्याची जमीन वापरून ४०% नफा शेतकऱ्याला आणि ६०% नफा गटाला मिळेल, अशा भागीदारीत भाजीपाला उत्पादन सुरू करण्यात आले. गटातील महिलांनी मेहनत, नियोजन आणि योग्य मार्गदर्शनाच्या जोरावर उत्पादन वाढवले आणि चांगले उत्पन्न मिळवले. आज ङ्गसंत सावता माळीफ बचत गटाने केवळ आर्थिक प्रगतीच साधलेली नाही, तर गावातील इतर महिलांसाठीही प्रेरणा निर्माण केली आहे. या यशामुळे गावातील आणखी गटांनी बँक लिंकेज करून ५ लाखांपर्यंत कर्ज घेत व्यवसाय सुरू करण्याचा आत्मविश्वास मिळवला आहे. ही यशोगाथा दाखवून देते की, योग्य मार्गदर्शन, एकजूट आणि मेहनत यांच्या जोरावर ग्रामीण महिला आत्मनिर्भर होऊ शकतात आणि आपल्या कुटुंबासह गावाच्या विकासातही मोलाचा वाटा उचलू शकतात.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा
९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८